| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०१९.नि.क्र.५५ वरील आदेश**<br>(अधिघोषीत दिनांक ०६ मार्च, २०२५)<br>**रामचंद्र व इतर– वि.– तुकाराम व इतर**<br>**CNR No. MHLA060001472019** |

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द निशाणी क्र.२३ खाली झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्याचा अर्ज सादर केला आहे.

**०२.** प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे की, वादी व प्रतिवादींमध्ये दिवाणी दावा क्र.११/२०२० हा दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर व जिल्हा व सत्र न्यायालयात फौजदारी खटले प्रलंबित असताना सर्व दावे व खटल्यात तडजोडी अंती निकाली काढण्याची वरीलप्रमाणे खटले निकाली निघाले व सदरचे प्रकरणात पक्षकारांची संख्या जास्त व अनेक ठिकाणी राहत असल्याचे त्यांच्यात ताळमेळ लावून तडजोड दाखल करण्यात विलंब झाला. त्यामुळे वादीच्या उलटतपासात विलंब झाला. प्रतिवादी व त्यांचे वकील सतत हजर होते. परंतु दिनांक २७.०३.२०२४ ते दुपारच्या सत्रात अनुपस्थित असल्याने निशाणी क्र.२३ वर प्रतिवादी विरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादी तर्फे उलट तपास नसल्यास सदरच्या दाव्यात योग्य असा पुरावा मा. न्यायालयात न येता प्रतिवादींचे मोठे नुकसान होणार आहे. प्रतिवादींनी सदर विलंब जाणिवपूर्वक केलेला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा पारीत झालेला आदेश रद्दबातल करणे न्यायाने योग्य राहिल. सबब, त्यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**०३.** वादीतर्फे सुविद्य विधिज्ञ यांनी प्रस्तुत अर्जास लेखी म्हणणे सादर केले आहे आणि असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात प्रतिवादींना अनेकवेळा संधी देऊनही प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेतला नाही. तसेच सदरचा अर्ज कायद्याच्या विरूध्द आहे. तरी सदरील अर्जावर वादीचा तिव्र आक्षेप आहे. सबब, त्यांनी प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री व्ही. एस. शेळके व वादीतर्फे विद्वान वकील श्री.एस. व्ही. देशमुख यांचा युक्तिवाद ऐकला.

## कारणमिमांसा

**०५.** सदर प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वाटणी होऊन ताबा मिळणेबाबत दाखल केला आहे. अभिलेखावरुन असे दिसून येत आहे की, दिनांक ०८.०१.२०२० रोजी वादीतर्फे साक्षीदार क्र.१ बालासाहेब पि. गणपतराव घोडके याचे सरतपासाचे शपथपत्र सादर करण्यात आलेले आहे. सदर शपथपत्राची प्रत प्रतिवादींनी त्याच दिवशी स्वीकारली आहे. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी वादीचा उलटतपास नोंदविला नाही. त्यामुळे दिनांक २७.०३.२०२४ रोजी त्यांच्याविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात आला. त्यानंतर दिनांक २७.०३.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज सादर केला

आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी वादीच्या साक्षीदाराचा उलटतपास नोंदविलेला नाही. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर व जिल्हा व सत्र न्यायालयात फौजदारी खटले प्रलंबित असताना सर्व दावे व खटल्यात तडजोडी अंती निकाली काढण्याची वरीलप्रमाणे खटले निकाली निघाले व सदरचे प्रकरणात पक्षकारांची संख्या जास्त व अनेक ठिकाणी राहत असल्याचे त्यांच्यात ताळमेळ लावून तडजोड दाखल करण्यात विलंब झाला. त्यामुळे वादीच्या उलटतपासात विलंब झाला. त्यामुळे प्रतिवादींना सदर तारखेस वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ बालासाहेब याचे उलटतपास नोंदविता आला नाही. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २४/०२/२०२० रोजी प्रतिवादींनी उलटतपास घेण्यासाठी मुदत मिळणेचा अर्ज सादर केला होता व तो अर्ज शेवटच्या संधीसह मंजूर झाला होता. पुरेशी संधी देवूनही प्रतिवादींनी वादीचा उलटतपास नोंदविला नाही. त्यामुळे असे स्पष्टपणे दिसून येते की, प्रतिवादी यांनी सदर प्रकरणात उलटतपास नोंदविण्यासाठी विलंब केलेला आहे.

**०६.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्ररकण हे वाटणी होऊन ताबा मिळणेबाबत दाखल केला असून दोन्ही पक्षांचे अचल संपती बाबत निर्णय होणार आहे. तसेच वादी यांनी केलेल्या कथनाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्रतिवादींना त्यांच्यातर्फे वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर झाल्यास वादीं यांचे कोणतेही नुकसान हाोणार नाही. उलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांच्यातर्फे वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणे न्यायोचीत आहे. तसेच प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसविणे आवश्यक आहे. विलंबाचा कालावधी पाहता प्रतिवादी यांच्याविरुध्द रु.६००/- खर्च बसविणे योग्य राहिल.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज रु.६००/- (रुपये सहाशे फक्त) खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.२ यांनी खर्चाची रक्कम वादी हिस द्यावी व पुढील तारखेस न चुकता वादीतर्फे साक्षीदार क्र.१ बालासाहेब यांचा उलटतपास नोंदवावा.

३) वादी क्र.२ बालासाहेब हा स्वत: साक्षीदार म्हणुन पुढील तारखेस न्यायालयासमोर हजर रहावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

Digitally signed by KANCHANKAUR GADIWALE
Date: 2025.03.07 15:20:03 +0530

ठिकाण : - अहमदपूर.
दिनांक :- ०६.०३.२०२५.

**(के.बी. गाडीवाले)**
सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
(कोर्ट नं.०४, अहमदपूर).